# अंतर्मुख करणारी कथा - ठाकूर का कुआँ

जोखूने पाण्याचा लोटा तोंडाला लावला तर पाण्याला खूप दुर्गंधी येत होती. गंगीला त्याने विचारले, हे कसले पाणी आहे? वासामुळे पिववत नाही. घसा सुकत चाललाय आणि तू सडके पाणी पाजतेयस.

गंगी रोज संध्याकाळी पाणी भरून आणत असे. विहीर दूर होती. पुन्हा पुन्हा जाणे कठीण होते. काल तिने पाणी आणले, तेव्हा त्यात दुर्गंधी अजिबात नव्हती. आज पाण्याला कसा वास येतोय? लोटा नाकाला लावला, तर खरंच दुर्गंधी होती. नक्कीच कोणते तरी जनावर विहिरीत पडून मेले असणार, पण दुसरे पाणी कुठून येणार?
ठाकुराच्या विहिरीवर कोण जाऊ देईल? दुरूनच लोक रागावतील.

साहूची विहीर गावाच्या ह्या टोकाला आहे, पण तिथे पाणी कोण भरायला देईल? गावात एकही विहीर नाहीये.

जोखू खूप दिवसांपासून आजारी आहे. थोडा वेळ तहानलेला तसाच पडून राहिला, मग म्हणाला, आता तर तहान सहन होत नाहीये. दे, थोडे पाणी नाक बंद करून पितो. गंगीने पाणी दिले नाही. खराब पाण्याने आजार वाढेल हे तिला माहीत होते पण हे माहीत नव्हते की पाणी उकळवल्याने त्याचा दोष निघून जाईल. म्हणाली - हे पाणी कसे पिणार? काय माहीत कोणते जनावर मेले आहे. विहिरीवरून दुसरे पाणी आणते.

जोखूने आश्चर्यचकित होऊन तिच्याकडे बघितले. पाणी कुठून आणशील?

ठाकूर आणि साहूंच्या दोन विहिरी आहेत. एक लोटाभर पाणी पण देणार नाहीत?

हात पाय मोडून येशील दुसरे काहीही होणार नाही. बस गपचूप. ब्राह्मण देवता आशीर्वाद देतील, ठाकूर लाठीने मारतील, साहुजी पाच रुपये घेतील. गरिबांचे दुःख कोण समजून घेते? आपण तर मरतो तेव्हा सुद्धा कोणी दारावर बघायला सुद्धा येत नाही, खांदा देणे तर दूरच राहिले. असे लोक विहिरीवर पाणी भरून देतील?
हे कटू सत्यच होते. गंगी काय उत्तर देणार? पण तिने ते दुर्गंधीयुक्त पाणी त्याला प्यायला दिले नाही.
.
.

रात्रीचे ९ वाजले होते. मजूर थकून भागून झोपून गेले होते, ठाकुरांकडे पाच दहा खुशालचेंडू मैदानात जमा झाले होते. साहसीपणाचा आता ना जमाना आहे ना संधी मिळते कोणाला. कायदेशीर साहसाच्या गप्पा चालू होत्या. किती हुशारीने ठाकुराने ठाणेदाराला सांगितले होते की एका खास खटल्याच्या कागदपत्रांची कॉपी घेऊन ये. सगळे म्हणत होते, कॉपी मिळणार नाही. कोणी ५० मागत होता, कोणी शंभर! त्याने कवडी किमतीत कॉपी मिळवली. काम करण्याची पद्धत माहीत असली पाहिजे.

ह्याच वेळी गंगी विहिरीवर पाणी भरायला पोचली. कंदिलाचा अंधुक उजेड विहिरी पर्यंत येत होता. गंगी विहिरीच्या कठड्याच्या आडोश्याला बसून संधीची वाट पाहू लागली. ह्या विहिरीचे पाणी सगळे गाव पिते. कोणालाच मनाई नाही, फक्त हे कमनशिबी लोक इथे पाणी भरू शकत नाहीत.

गंगी चे विद्रोही मन निर्बंधांच्या प्रथेविरुद्ध आणि असहाय्यते विरुद्ध बंड करू लागले - आम्ही का नीच आहोत आणि हे लोक उच्च आहेत? ह्यासाठी की हे गळ्यात हार घालतात? इथे जे आहेत, ते एकाहून एक खोटारडे आहेत. चोरी हे करतात, लांडी- लबाडी हे करतात, खोटे खटले हे करतात. हल्लीच ह्या ठाकुराने एका बिचाऱ्या मेंढपाळाची मेंढी चोरली आणि नंतर मारून खाल्ली. ह्या पंडितांच्या घरी तर बाराही महिने जुगार चालतो. हे साहुजी तर तुपात तेल मिसळून विकतात. आमच्याकडून काम करून घेतात, मजुरी देताना मात्र जीव जातो (नानी मरती है). कुठल्या गोष्टीत आमच्याहून मोठे आहेत? आम्ही गल्ली गल्लीत ओरडत फिरत नाही की आम्ही उच्च आहोत, आम्ही उच्च आहोत. मी कधी गावात गेले तर हपापलेल्या नजरेने बघायला लागतात. पण घमेंड आहे की आम्ही उच्च आहोत.

विहिरीवर कोणीतरी येतंय अशी चाहूल लागली. गंगीच्या छातीत धडधडू लागले. कोणी बघितले तर गहजब होईल. एखादी लाथ सुद्धा नको बसायला. तिने मडके आणि दोरी उचलली आणि वाकून चालत एका वृक्षाच्या अंधाऱ्या सावलीत जाऊन उभी राहिली. ह्या लोकांना कधी कोणाची दया आली आहे? बिचाऱ्या महगूला एवढे मारले की महिनोन महिने थुंकीतून रक्त पडत होते. म्हणूनच त्याने बिगारी दिली नव्हती. ह्यामुळे हे लोक उच्च होतात?
विहिरीवर बाया पाणी भरायला आल्या होत्या. त्यांच्या गप्पा चालू होत्या.
"जेवायला बसलो आणि हुकूम झाला की ताजे पाणी भरून आण. मडक्यासाठी पैसे नाहीयेत. आपल्याला आरामात बसलेले बघून जणू पुरुष जळफळतात."
"हो ना, असे नाही होत की स्वतःच कळशी उचलून भरून आणतील. बस्स, हुकूम केला की ताजे पाणी भरून आण, जणू काही आम्ही मोलकरणीच आहोत."
"मोलकरणी नाहीत तर काय आहात तुम्ही? रोटी- कपडा नाही मिळत तुम्हाला? दहा पाच रुपये सुद्धा झटपट करून मिळवताच ना? मोलकरणी अजून काय वेगळ्या असतात?"

"लाजवू नकोस, दीदी! थोडातरी आराम करण्यासाठी जीव तळमळत असतो. इतके काम दुसऱ्या कोणाकडे केले असते, तर ह्याहून कितीतरी जास्त आरामात राहिले असते. वरून त्याने आभार मानले असते. इथे कामे कर करून मेले तरी कोणाची तोंडे सरळ होत नाहीत."

दोघी पाणी भरून निघून गेल्या, तेव्हा गंगी वृक्षाच्या सावलीतून निघाली आणि विहिरीच्या कठड्याजवळ आली. ते खुशालचेंडू लोक निघून गेले होते. ठाकूर सुद्धा दरवाजा बंद करून आतमध्ये अंगणात झोपायला जात होते. गंगीने क्षणिक सुखाने श्वास घेतला. चला मैदान तर साफ झाले! पूर्वीच्या काळात जो राजपुत्र अमृत चोरायला गेला होता, कदाचित तो सुद्धा एवढ्या सावधगिरीने आणि विचारपूर्वक गेला नसेल. गंगी दबक्या पावलांनी विहिरीच्या कठड्यावर चढली, ह्याआधी तिला अशी विजयाची भावना कधीच वाटली नव्हती.
तिने मडक्याला दोरीचा फास लावला. दोन्ही बाजूंना सावधपणे बघितले, जणू कोणी शिपाई रात्रीच्या वेळी शत्रू च्या किल्ल्यात टेहळणी करत असावा. जर ह्या वेळी तिला पकडले तर तिला माफी किंवा सुटकेची थोडी सुद्धा आशा नाही.
शेवटी तिने देवांना आठवून मन घट्ट केले आणि तो घडा विहिरीत सोडला.
घडा पाण्यात बुडाला, अगदी हळुवारपणे. जराही आवाज आला नाही. गंगी ने भराभर २-४ हात मारले. घडा विहिरीच्या तोंडाशी आला. एखादा मोठा दणकट पहिलवान सुद्धा इतक्या जोराने खेचू शकला नसता. गंगी वाकली आणि घडा कठड्यावर ठेवणार इतक्यात ठाकूर साहेबांच्या घराचे दार उघडले. वाघाचे दर्शन सुद्धा ह्याहून जास्त भयानक नसेल.
गंगी च्या हातातून दोरी सुटली. दोरीसकट घडा धाडकन पाण्यात कोसळला आणि काही क्षण पाण्यात लाटांचे आवाज येत राहिले.
ठाकूर कोण आहे? कोण आहे? विचारत विहिरीकडे जात होते आणि गंगी कठड्यावरून उडी मारून धावत सुटली होती.
घरी जाऊन बघते तर काय जोखू लोटा तोंडाला लावून तेच घाणेरडे पाणी पीत होता.

**लेखक: मुन्शी प्रेमचंद**

**भाषांतर: डॉ मंजिरी मणेरीकर**

(ही कथा प्रेमचंद यांच्या ’२१ अनमोल कथा’ या पुस्तकातून घेतली आहे. Maple press private limited ह्या प्रकाशन संस्थेने हे पुस्तक संपादित केले आहे. त्यांच्या परवानगीने मी ह्या कथेचे भाषांतर केले आहे.
This story is the translation of Munshi Premchand's story 'Sava Ser Gehun' from the book ’२१ अनमोल कथा’ published by Maple Press Private Limited. I have translated it with their permission.)